## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :१४७/२०२२/नंदुरबार**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. फिरोज खॉ गौस खॉ,<br>रा. फिरदोस कॉलनी, गणवाडी रोड,<br>मु.पो. ता. मलकापूर, जि.बुलढाणा. | जन माहिती अधिकारी,<br>जामिआ इस्लामिआ ईशातूल उलूम,<br>अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा,<br>जि. नंदुर्बार-४२५४१५. |

**सुनावणी दिनांक २४/०६/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ३१/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २४/०६/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक. ३१/०३/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाने आदेशित केल्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. १०११/२०२०/नंदुरबार व द्वितीय अपील क्रमांक. ११४७/२०२०/नंदुरबार वरील निर्णय दिनांक १६/१२/२०२१ व दि. ०४/०१/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी, जामीआ इस्लामीआ ईशातुल उलूम, अक्कलकुवा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५/०९/२०१९, दि. २३/०९/२०१९ व दि. ०४/०१/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

४) सुनावणीपुर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. २१/०४/२०२२ च्या पत्रान्वये मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त झालेला असून तक्रारदारास दि. ०२/०३/२०२२ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने प्रत्यक्ष येवून दप्तराची पडताळणी करुन हवी असलेली माहिती घेवून जावे, असे कळविले असल्याचे दिसते. तथापि आयोगाने माहिती पुरविण्याचे आदेश दिलेले असतांना जन माहिती अधिकारी यांनी केलेली पडताळणीबाबतची कार्यवाही योग्य नाही. तसेच सुनावणीसाठी देखील संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यामुळे या तक्रारीची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. १०११ ते १०१३/२०२०/नंदुरबार व द्वितीय अपिल क्रमांक. ११४७/२०२०/नंदुरबार मध्ये दिनांक १६/१२/२०२१ व दि. ०४/०१/२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. १०११ ते १०१३/२०२०/नंदुरबार व द्वितीय अपिल क्रमांक. ११४७/२०२०/नंदुरबार मध्ये दिनांक १६/१२/२०२१ व दि. ०४/०१/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे तत्कालीन जन माहिती अधिकारी, जामीआ इस्लामीआ ईशातुल उलूम, अक्कलकुवा यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी तात्काळ आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक १४७/२०२२/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र 2082 — 21 MAR 2025